दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३३४ वा ● शुक्रवार, ता. २० जून २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००


## तृतीयपंथीय सक्षमीकरणासाठी प्रशासन सज्ज

# २० जून रोजी विशेष कार्यशाळा

### दिशा पिंकी शेख करणार मार्गदर्शन




**अहमदनगर । प्रतिनिधी**

तृतीयपंथीयांना सामान्य नागरिकांप्रमाणे वागणूक मिळावी, समुदायाशी संबंधित सामाजिक समावेश, सक्षमीकरण आणि त्यांच्या कल्याणासाठी शासकीय यंत्रणांनी अधिक प्रभावी भूमिका बजावण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या संकल्पनेतून जिल्हाधिकारी कार्यालयात ता. २० जून रोजी सकाळी १०.३० वाजता शासकीय विभाग प्रमुखांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रविण कोरगंटीवार यांनी दिली. तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण योजनेंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तृतीयपंथीय तक्रार निवार समिती कार्यरत आहे. या कार्यशाळेतून तृतीयपंथीयांची ओळख, त्यांच्या समस्यांची जाणीव तसेच तृतीयपंथीयांविषयी संवेदनशीलता निर्माण करत त्यांना सन्मानपूर्वक वागणूक देऊन विविध शासकीय योजनांमध्ये समाविष्ट करुन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत प्रमुख व्याख्याता म्हणून लेखिका, कवयित्री व सामाजिक कार्यकर्त्या दिशा पिंकी शेख मार्गदर्शन करणार आहेत. फ सर्व विभाग प्रमुखांनी या कार्यशाळेस उपस्थित राहण्याचे आवाहनही कोरगंटीवार यांनी केले आहे.

# HSRP नंबर प्लेटसाठी मुदतवाढ

## आता १५ ऑगस्टपर्यंत अंतिम संधी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील जुन्या वाहनधारकांसाठी एक दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र सरकारने (HSRP High Security Registration Plate) क्रमांक प्लेट बसविण्याची अंतिम मुदत वाढवून आता १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत केली आहे. या निर्णयामुळे १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व दुचाकी, चारचाकी व अन्य वाहनधारकांना आणखी काही काळ मिळणार आहे. यापूर्वी ही अंतिम मुदत ३० जून २०२५ होती. मात्र वाहनधारकांची मागणी आणि तांत्रिक अडचणी लक्षात घेता राज्य सरकारने ही मुदत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारचा इशारा ही शेवटची संधी! राज्य सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे की, ही मुदतवाढ ही शेवटची संधी असून १५ ऑगस्टनंतर HSRP न बसविलेल्या वाहनांवर थेट दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. HSRP प्लेटमुळे वाहन चोरी रोखण्यास मदत होते आणि ती आरटीओकडून प्रमाणित असते. त्यामुळे सर्व वाहनधारकांनी वेळेत ही प्लेट बसवून कायदेशीर जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन करण्यात आले आहे. बसविण्यासाठी काय करावे? वाहनधारकांना अधिकृत विक्रेत्यांच्या वेबसाइटवरून किंवा संबंधित वाहन निर्माता कंपन्यांच्या पोर्टलवरून साठी ऑनलाइन नोंदणी करता येते. यानंतर निश्चित वेळेवर आपल्या नजीकच्या अधिकृत केंद्रावर जाऊन प्लेट बसविता येते. आपण २०१९ पूर्वीचे वाहन वापरत असाल तर ही संधी गमावू नका. १५ ऑगस्ट २०२५ अगोदरच आपले HSRP बसवून संभाव्य दंडापासून वाचा!



## आदिवासी भिल्ल स्मशानभूमीत उत्खनन

# कठोर कारवाई करा- प्राजक्त तनपुरे

### वाळू माफियांवर संताप

**राहुरी । प्रतिनिधी**

संपुर्ण अहिल्यानगर जिल्ह्यासह राहुरी तालुका व परिसरात वाळू माफिया, मुरूम माफिया व गौण खनिज माफियांनी अक्षरशः उच्छाद मांडलेला आहे. याचा अतिरेक आज खडांबे खुर्द गावात दिसून आला, जेव्हा स्थानिक भिल्ल आदिवासी समाजाच्या स्मशानभूमीतच अवैधरित्या उत्खनन करण्यात आले. या ठिकाणी गाडण्यात आलेल्या मृतदेहांचे अवशेष विखुरले गेले. मृतांचा आणि त्यांच्या कुटुंबीयांचा हा घोर अपमान असल्याचे सांगत, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी संबंधितांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली. घटनास्थळी उपस्थित राहून त्यांनी संतप्त नागरिकांच्या भावना ऐकून घेतल्या आणि प्रशासनाची झोप उडवणारा सवाल उपस्थित केला. ''या उत्खननासाठी वापरलेल्या डंपर व जेसीबींवर क्रमांक प्लेटच नव्हत्या. सामान्य माणसांवर तत्काळ कारवाई करणारे वाहतूक पोलिस असेवेळी कुठे असतात?'', असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ते पुढे म्हणाले, ''या प्रकाराबाबत यापूर्वीही मी अनेक वेळा तत्कालीन तहसीलदारांकडे तक्रार केली होती. मात्र केवळ किरकोळ कारवाई झाली आणि माफियांना मोकळे रान मिळाले. आजच्या घटनेमुळे त्याचे गंभीर परिणाम आपल्यासमोर आहेत.'' प्राजक्त तनपुरे यांनी इशारा दिला की, ''अशा बेकायदेशीर आणि अमानवी कृत्यांवर जर त्वरित ठोस कारवाई झाली नाही, तर आम्हाला अधिक तीव्र आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल. हा केवळ स्मशानभूमीचा अपमान नाही, तर संपूर्ण समाजाच्या संवेदनांचा अपमान आहे.''दरम्यान, या प्रकरणाची दखल घेऊन प्रशासनाने संबंधित वाहनांवर आणि उत्खनन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. घटनास्थळी मोठ्या प्रमाणात जमलेले नागरिक आणि ग्रामस्थांनी आपला संताप व्यक्त करत, अशा घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली आहे.




# भूसंपादन प्रकल्पांना वेगात पूर्ण करा

# मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील सर्व महत्त्वाच्या रस्ते, रेल्वे आणि विमानतळ प्रकल्पांचे भूसंपादन ठरलेल्या वेळापत्रकानुसार पूर्ण करावे, जेणेकरून कोणताही प्रकल्प रखडू नये, अशा स्पष्ट सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या आहेत. राज्याच्या प्रगतीला चालना देणारे हे प्रकल्प वेळेत मार्गी लागणं आवश्यक असून, भूसंपादन हा त्यातला महत्वाचा टप्पा आहे, असेही ते म्हणाले. फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी आयोजित बैठकीत राज्यातील विविध महत्त्वाच्या प्रकल्पांचा भूसंपादनाच्या दृष्टीने आढावा घेतला. या बैठकीत नागपूर गोवा शक्तिपीठ महामार्ग, विरार अलिबाग कोस्टल कॉरिडोर, जालना नांदेड द्रुतगती महामार्ग, पुणे रिंग रोड (पूर्व, पश्चिम व विस्तारीकरण), भंडारा गडचिरोली, नागपूर चंद्रपूर, नागपूर गोंदिया हे द्रुतगती मार्ग, तसेच नवेगाव (मोर) सुरजागड मिनरल कॅरिडोर आणि वाढवण इगतपुरी द्रुतगती महामार्ग या महत्वाकांक्षी रस्ते प्रकल्पांचा समावेश होता. या व्यतिरिक्त वर्धा - नांदेड आणि वर्धा - गडचिरोली हे प्रस्तावित रेल्वे प्रकल्प आणि कोल्हापूर, कराड, अकोला, गडचिरोली तसेच छत्रपती संभाजीनगर येथे प्रस्तावित विमानतळ प्रकल्पांचेही भूसंपादन प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना स्पष्टपणे बजावले की, भूसंपादनाच्या अडचणीमुळे कोणताही प्रकल्प लांबणीवर पडू नये. लोकप्रतिनिधींशी समन्वय साधून आणि स्थानिक नागरिकांशी संवाद साधून भूसंपादन प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. राज्याच्या समृद्धी आणि सर्वांगीण विकासासाठी वाहतुकीची सुलभ व्यवस्था अत्यंत आवश्यक असल्याने हे सर्व प्रकल्प निर्णायक ठरणार आहेत. त्यामुळे नियोजित कालावधीतच सर्व कामे पूर्ण करण्याचा निर्धार शासनाने व्यक्त केला आहे.

## जात, भूगोल आणि मृत्यू

# मणिपूरातील कुकी मुलीच्या अंत्ययात्रेची शोकांतिका

**गुवाहाटी/कोलकाता । प्रतिनिधी**

एअर इंडिया फ्लाइट १७१ मधील कुकी समुदायातील विमानसेविका लामुंथेंन सिंगसन (वय २६) हिच्या पार्थिवाला आता तिच्या मूळगावी म्हणजेच मणिपूरमधील कांगपोकपी येथे नेले जाणार आहे. मात्र हा प्रवास इंफाळमार्गे होणार नाही. त्याऐवजी तिच्या पार्थिवासाठी नागालँडमधील दीमापूरमार्गे २५० किमीची वळणावळणांची सुरक्षित वाट निवडली गेली.

कारण तो मार्ग मैतेई वर्चस्व असलेल्या भागांतून जात नाही. एअर इंडियाचे हे विमान १२ जून रोजी अपघातग्रस्त झाले होते. त्यामधील मृतांपैकी लामुंथेंनची ओळख डीएनए अहवालाद्वारे झाली. तिच्या भावाने पार्थिव ओळखले आणि आता ते अहमदाबादहून नागालँडमार्गे आणले जात आहे. तिच्यावर शुक्रवारी सायंकाळी कांगपोकपी येथे अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. लामुंथेंनच्या आईने सांगितले की, तिला गमावल्याचे दुःख मला आता आयुष्यभर सोबत ठेवावे लागेल. ती माझी एकुलती एक मुलगी होती. घरातील सदस्य आता एका भाड्याच्या घरात शरणार्थी आयुष्य जगत आहेत. हिंसाचारामुळे मूळ घर सोडावे लागले. ही घटना जातीय तणावाचे भयंकर रूप दाखवते. मृत्यूही आता जात विचारून जातो, ही आधुनिक भारताची शोकांतिका आहे. मणिपूरातील कुकी आणि मैतेई समुदायांतील संघर्ष आता इतका गडद झाला आहे की, मृतदेहालाही मार्ग निवडताना जात आणि भूगोल बघावा लागतो. कुकी स्टुडंट्स ऑर्गनायझेशनचे सदस्य के. सॉन्गरिंग यांनी स्पष्ट सांगितले की, इंफाळमार्गे जाणे अशक्य होते. तो मार्ग असुरक्षित होता. म्हणून दीमापूरचा २५० किमीचा वळणाचा मार्ग स्वीकारावा लागला. राष्ट्रीय शरमेचा विषय : हा केवळ एका कुकी युवतीच्या मृत्यूचा विषय नाही. हा एक राष्ट्रीय शरमेचा आरसा आहे. जेथे सरकार अपयशी ठरते, तेथे मृतदेहही जातीय गणितांच्या कचाट्यात अडकतात. लामुंथेंनची अखेरची उड्डाण केवळ तिच्या घरापर्यंतच नाही, तर भारतीय लोकशाहीच्या अंतःकरणात जावे अशी अपेक्षा आहे.



## वन्यजीव संरक्षणासाठी समृद्धी महामार्गावर विशेष यंत्रणा

# १०० सुरक्षित मार्गांची व्यवस्था

**मुंबई । प्रतिनिधी**

समृद्धी महामार्ग प्रकल्पातील वन्यजीव संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. महामार्गावर एकूण १०० विशेष मार्गांची उभारणी करण्यात आली असून त्यामध्ये ८ उन्नत (ओव्हरपास) मार्ग आणि ९२ भुयारी (अंडरपास) मार्ग यांचा समावेश आहे. या उपाययोजनांमुळे वन्यप्राण्यांचा नैसर्गिक वावर कायम राहण्यास मोठी मदत होणार आहे. वन्यप्राण्यांचे आवाजामुळे होणारे त्रास कमी व्हावेत यासाठी ध्वनिरोधक यंत्रणा (noise barriers) ठिकठिकाणी बसविण्यात आल्या आहेत. यामुळे महामार्गावरील वाहनांच्या आवाजाचा परिणाम जंगलातील परिसंस्थेवर होणार नाही. तसेच, ज्या भागांमध्ये वन्यप्राणी वारंवार आढळतात त्या भागांमध्ये संरक्षक भिंतींची उंची वाढवण्यात आली आहे, जेणेकरून अपघात किंवा मार्गावरील चुकून वावर टाळता येईल. समृद्धीमहामार्ग हा केवळ वाहतुकीसाठी नव्हे, तर पर्यावरण-संवेदनशील दृष्टिकोन ठेवून उभारण्यात आलेला महामार्ग आहे, हे या उपाययोजनांवरून स्पष्ट होते. प्रकल्पाच्या अंमलबजावणीत वन्यजीव संवर्धनाचा विचार केल्यामुळे हा महामार्ग एक हरित व सुरक्षित प्रगतीमार्ग ठरत आहे.




# शिवस्वराज्यभूषण पुरस्कार सोहळा थाटात संपन्न

### इतिहासविचारांचे थोर मानकरी डॉ. पवार व डॉ. साळुंखे यांचा गौरव

**मुळशी । प्रतिनिधी**

१८ जून हा दिवस मुळशीवासीयांसाठी अत्यंत अभिमानाचा आणि ऐतिहासिक ठरला. सह्याद्री प्रतिष्ठान, मुळशी यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या शिवस्वराज्यभूषण पुरस्कार २०२४ व २०२५ चा भव्य सोहळा पार पडला. यंदाचे मानकरी ठरलेले दोन दिग्गज इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार आणि डॉ. आ.ह. साळुंखे यांनी हा मान सन्मानाने स्वीकारला. या दोन विचारवंतांनी गेली अनेक दशके समाजात ऐतिहासिक आणि सांस्कृतिक प्रबोधनाचे कार्य केले असून, त्यांनी केलेल्या योगदानाबद्दल सह्याद्री प्रतिष्ठानने कृतज्ञता व्यक्त करत त्यांचा गौरव केला. वय, आजारपण अशा अडचणी असूनही त्यांनी मुळशीमध्ये येऊन पुरस्कार स्वीकारला, हे संपूर्ण मुळशीसाठी अभिमानास्पद ठरले. या सोहळ्याचे अध्यक्ष श्री शाहू छत्रपती महाराज होते, तर पुरस्काराचे वितरण पद्मविभूषण शरद पवार साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पवार साहेबांनी आपल्या भाषणात मुळशीच्या ऐतिहासिक भूमिकेचा उल्लेख करत म्हटले, ''स्वराज्याच्या निर्मितीत आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्यात मुळशीचे योगदान अतुलनीय होते.'' त्यांच्या या शब्दांनी उपस्थित मुळशीकरांच्या मनात अभिमानासोबतच जबाबदारीची जाणीवही निर्माण केली. कार्यक्रमास संसदरत्न सुप्रिया सुळे, मा. उल्हासदादा पवार, आ. जगन्नाथ शेवाळे, मा. प्रशांतदादा जगताप, सविताताई दगडे, शांताराम इंगवले, प्रविण गायकवाड, विकासभाऊ लवांडे, रविकांत वर्पे, श्रीमंत कोकाटे, महादेव कोंढरे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. सह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल सरस्वती निवृत्ती पवार यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे, सहकाऱ्यांचे आणि मुळशीतील जनतेचे आभार मानत हा सोहळा यशस्वी करणाऱ्या प्रत्येकाचे मन:पूर्वक अभिनंदन केले. हा सोहळा मुळशीच्या सांस्कृतिक जागृतीच्या वाटचालीत एक मैलाचा दगड ठरला, हे नक्की!

# हिंदी सक्तीचा निर्णय मागे घ्या- भारतीय कम्युनिस्ट पक्षाची मागणी

### 'अनिवार्य'च्या ऐवजी 'सर्वसाधारण' असा शब्द बदल म्हणजे मराठीच्या अस्मितेवर घाला

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य शासनाने प्राथमिक शिक्षणात हिंदी भाषेसंबंधी 'अनिवार्य' ऐवजी 'सर्वसाधारण' असा शब्द वापरून महाराष्ट्रात हिंदी भाषा लादण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. हा निर्णय महाराष्ट्राच्या अस्मितेवर आणि मराठी भाषेच्या अस्तित्वावर थेट आघात करणारा असून तो तात्काळ मागे घेण्यात यावा, अशी जोरदार मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलने केली आहे. ही माहिती भाकपचे राज्य सचिव ॲड. सुभाष लांडे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. त्यांनी सांगितले की, ''मराठी ही महाराष्ट्राच्या हृदयातील भाषा आहे. तिच्यावर कुठल्याही प्रकारची जबरदस्ती सहन केली जाणार नाही. हिंदी सक्ती म्हणजे मराठीच्या अस्तित्वाचा खून करण्याचा प्रयत्न आहे.'' पहीली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना हिंदी सक्तीची केल्यास मराठी छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात हिंदी हुकूमशाही ठोकली जात असल्याचे चित्र निर्माण होईल.





''मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा डांगोरा पिटायचा आणि शिक्षणामध्ये दुसऱ्याच भाषेची सक्ती करायची, हे दुटप्पी धोरण फडणवीस सरकारचे मराठीविरोधी चेहरा उघड करते,'' असा घणाघात भाकपने केला आहे.

भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मराठी जनतेला गृहीत धरून, त्यांच्या मुलांवर शिक्षणात हिंदीची सक्ती लादू पाहत आहेत, असा आरोप करताना रा.स्व. संघाचे एक नेते जोशी यांचे ''मुंबईत मराठीत बोलण्याची गरज नाही'' हे विधानही भाकपने उद्धृत करून टीकेचा रोख वाढवला आहे. हिंदी भाषेबद्दल आदर असूनही तिची सक्ती करून महाराष्ट्रात दिशाभूल व वर्चस्ववादी विचार लादण्याचा प्रयत्न भाजप सरकार करत असल्याचे भाकपने स्पष्ट केले.

### भाकपचा आरोप

''कोवळ्या वयातील बालकांवर राजकीय हेतूने प्रेरित असलेली भाषिक सक्ती अवैज्ञानिक असून ती बालमनोविज्ञानाच्या विरोधात आहे,'' असे स्पष्ट मत पक्षाच्या वतीने मांडण्यात आले आहे. राज्य सरकारने आपल्या निर्णयावर पुनर्विचार करून तो तात्काळ मागे घ्यावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे.

# शिक्षण अंधारातून प्रकाशाकडे नेणारे माध्यम- ॲड. आगरकर

## श्री विशाल गणेश मंदिराच्यावतीने विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरातील ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिराच्यावतीने सामाजिक बांधिलकी जपत श्री संत सावताश्रम शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले विद्या मंदिरातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे (वह्या) वाटप करण्यात आले. शिक्षणाच्या प्रचार-प्रसारात मदतीचा हात पुढे करत मंदिर प्रशासनाने हा स्तुत्य उपक्रम हाती घेतला. या वेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर म्हणाले, ''शिक्षण हेच एकमेव माध्यम आहे जे व्यक्तीला अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जाते. मंदिर हे केवळ धार्मिक उपासना स्थळ न राहता, समाजासाठी कार्य करणारी संस्था म्हणून पुढे येत आहे. लहानपणी मिळालेली



अशी मदत विद्यार्थ्यांच्या मनात ठसते आणि त्यातून समाजप्रेमी नागरिक घडतात. म्हणूनच अशा उपक्रमांना आम्ही सातत्य ठेवणार आहोत.'' कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे चेअरमन बाळासाहेब बोराटे उपस्थित होते. ते म्हणाले, ''शिक्षण हीच खरी संपत्ती आहे. आज दिल्या जाणाऱ्या वह्या केवळ साहित्य नसून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचे पहिले पाऊल आहे. समाजातील प्रत्येक घटकाने असे योगदान दिल्यास आपले शहर आणि देश शिक्षणाच्या प्रकाशाने उजळेल.'' कार्यक्रमास देवस्थानचे उपाध्यक्ष पंडित खरपुडे, सचिव अशोक कानडे, विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, चंद्रकांत फुलारी, ज्ञानेश्वर रासकर, नितीन पुंड, संजय चाफे, हर्षल म्हस्के आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात संस्थेचे सचिव प्रा. सुनील जाधव यांनी संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली. ''आमच्या संस्थेमध्ये अनेक सामान्य कुटुंबांतील मुले शिक्षण घेत आहेत. त्यांच्या शिक्षणासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील असतो. आजचे वह्यांचे वाटप हे त्या प्रयत्नांना मोठा हातभार लावणारे आहे,'' असे त्यांनी नमूद केले. सुत्रसंचालन राजीव घोलप यांनी केले तर आभारप्रदर्शन राजकुमार शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाने सामाजिक जाणिवा जागृत करण्यास मदत केली असून, उपस्थित पालक व विद्यार्थी वर्गात समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.

# अहमदनगर महाविद्यालयात पोलिस भरती मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन

## ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी हे केंद्र वरदान ठरेल- डॉ.आर.जे.बार्नबस

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहमदनगर महाविद्यालयात पोलिस भरती मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. भा.पां. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस यांच्या हस्ते या उपक्रमाचे लोकार्पण करण्यात आले. या केंद्रामुळे ग्रामीण व शहरी भागातील हजारो तरुण-तरुणींना पोलिस सेवेत सहभागी होण्यासाठी मार्गदर्शन मिळणार असून, हे केंद्र त्यांच्या स्वप्नांना दिशा देणारे ठरेल,



असे मत डॉ. बार्नबस यांनी यावेळी व्यक्त केले. ते म्हणाले, ''आजचा दिवस केवळ उद्घाटनाचा नाही, तर एका नव्या युगाची सुरुवात आहे.'' उद्घाटन सोहळा अहमदनगर महाविद्यालय आणि महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत पार पडला. या केंद्रात दैनंदिन शारीरिक प्रशिक्षण, लेखी परीक्षेसाठी अभ्यासवर्ग, मॉडेल टेस्ट्स, मानसिक तयारीसाठी व्याख्याने, योग्य आहार, वैद्यकीय तपासणी आणि पोलिस भरती प्रक्रियेची सर्व तांत्रिक माहिती उपलब्ध करून दिली जाणार आहे. यावेळी डॉ. बार्नबस यांनी महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांचे विशेष आभार मानले. या कार्यक्रमास भा.पां. शिक्षण संस्थेचे सचिव विशाल बार्नबस, प्रमुख प्रशिक्षक आणि सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक राजू वैराळे, उपप्राचार्य प्रा. दिलीपकुमार भालसिंग, डॉ. प्रीतमकुमार बेदरकर, डॉ. सय्यद रज्जाक, डॉ. कमलाकर भट, डॉ. अभिजित कुलकर्णी, प्रा. सुरेश घुले, डॉ. सचिन राळेगणकर, ग्रंथपाल प्रशांत फुगणर आदी मान्यवर उपस्थित होते.

# संत निरंकारी मिशनकडून एक पृथ्वी, स्वस्थ संसार योगदिनाचे आयोजन

**अहमदनगर । प्रतिनिधी**



संत निरंकारी मिशनच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून शनिवार, ता. २१ जून २०२५ रोजी देशभरात १००० पेक्षा अधिक ठिकाणी सामूहिक योग दिवसाचे आयोजन करण्यात येणार आहे. मिशनच्या विविध शाखांमध्ये स्थानिक योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली खुले प्रांगण, उद्याने आणि सार्वजनिक ठिकाणी हे सत्र पार पडणार आहे. यात निरंकारी भक्तगण, सेवादल स्वयंसेवक व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. अहमदनगर शहरातील मिस्कीन रोड येथील निरंकारी सत्संग भवन येथेही सकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत योग सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन स्थानिक प्रबंधकांनी केले आहे. यंदा आंतरराष्ट्रीय योग दिनाचा विषय 'एक पृथ्वी, एक स्वास्थ्य करिता योग' असा संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केला आहे. याच धर्तीवर संत निरंकारी मिशनने व्यापक स्वरूपात योग सत्रांचे आयोजन केले असून, संपूर्ण भारतभर विविध केंद्रांवर हे उपक्रम राबवले जाणार आहेत. संत निरंकारी मंडळाचे सचिव जोगिंदर सुखीजा यांनी माहिती दिली की, २०१५ पासून संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या माध्यमातून योग दिवस देशभर साजरा केला जात आहे. सतगुरू माता सुदीक्षा महाराज यांच्या आशीर्वादाने हा उपक्रम सातत्याने विस्तारत असून, समाजात शारीरिक, मानसिक आणि आत्मिक आरोग्याचे महत्व पोहोचवण्याचे कार्य यामार्फत केले जात आहे. सतगुरू माताजींच्या मार्गदर्शनानुसार, ''योग केवळ शरीरासाठी नाही, तर मनाच्या शांततेसाठी व आत्म्याच्या जागृतीसाठीही अत्यावश्यक आहे.'' नियमित योगसाधनेमुळे मनुष्य तनाव, असंतुलन आणि विविध आजारांपासून दूर राहून आत्मिक समाधान व सामाजिक सौहार्द प्राप्त करू शकतो. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत शरीर आणि मनाच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. संत निरंकारी मिशनचा हा उपक्रम याच दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे.

# सेवानिवृत्त शिक्षक, अधिकारी यांचे प्रलंबित प्रश्न सोडवा



**अहमदनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटना शाखा अहिल्यानगर यांच्यातर्फे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात निवेदन देण्यात आले. यावेळी निवेदन देताना संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. निवेदनात खालील प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या: सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या समस्यांची सोडवणूक 'पेन्शन अदालती'त केली जावी. पात्र निवडश्रेणी व वरिष्ठ वेतनश्रेणीच्या यादी पंचायत समिती स्तरावर प्रसिध्द करून त्यावर हरकती मागवून फरकाची रक्कम अदा करण्यात यावी. १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान सेवानिवृत्त झालेल्यांपैकी ज्या शिक्षकांचा गटविमा अद्याप अदा झालेला नाही, अशा सर्वांची त्रुटीसह यादी संघटनेस दिली जावी. गटविमा अदा झालेल्यांची यादी, रक्कम जमा केल्याची तारीख आणि नमुना क्र. ११ संबंधित शिक्षकास प्रदान करण्यात यावा. सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना ७व्या वेतन आयोगानुसार थकित हप्ते त्वरीत अदा करावेत. प्रॉव्हिडंट फंड, पेन्शन विक्री, ग्रॅज्युइटीच्या रकमा सेवामुक्तीनंतर त्वरित मिळाव्यात. संगणक कपात केलेल्या रकमेची शासनाकडे मागणी करावी आणि त्याबाबतचे मागणीपत्र संघटनेस उपलब्ध करून द्यावे. सेवानिवृत्त शिक्षकांसाठी ओळखपत्र जारी करावीत. दरमहा १ ते ५ तारखेच्या दरम्यान पेन्शनचे वितरण करण्यात यावे. तालुका व जिल्हा स्तरावर दरमहा नियमित 'पेन्शन अदालत' भरवावी. मागील अदालतीत चर्चिलेल्या विषयांची योग्य ती अंमलबजावणी व्हावी. या निवेदनप्रसंगी जिल्हाध्यक्ष दिलीप दहीफळे, कार्याध्यक्ष शरफुद्दीन शेख, सरचिटणीस सुनील जाधव, नेवासाचे अध्यक्ष योसेफ मकासरे, उपाध्यक्ष अशोक बडे, आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे संचालक दशरथ हजारे, ज्योती क्रांतीचे संचालक विष्णू हजारे, पाराजी झावरे, तुकाराम ठाणगे, मधुकर शिंदे, पांडुरंग घोडके, जगन्नाथ खामकर, ज्ञानदेव ढाकणे आदी मान्यवर उपस्थित होते. या सर्व मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरीत निर्णय घ्यावा, अन्यथा पुढील आंदोलनात्मक पावले उचलण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

# 'बकरीदचा वैश्विक संदेश'; जमात ए इस्लामीचा सर्वधर्मीय मिलन कार्यक्रम

**अहमदनगर । आबीद खान**

जमाअत ए इस्लामी हिंद, नगर यांच्या वतीने कासमखानी मशीद येथे सर्वधर्मीय बांधवांसाठी 'बकरीद उर्फ ईदुल अज्हा' मिलन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला विविध धर्मांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. इक्राम खान यांनी प्रास्ताविक करताना 'बकरीद' साजरी करण्यामागील ऐतिहासिक पार्श्वभूमी व तिचा माणुसकीसंदेश याचे विवेचन केले. समाजातील गैरसमज दूर करून धार्मिक सलोखा आणि परस्पर समज वाढवणे हा या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. सय्यद रफीक यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''बकरीद हा सण प्रेषित इब्राहीम (अ.), त्यांच्या पत्नी हाजरा (अ.) आणि पुत्र इस्माईल (अ.) यांच्या महान त्यागाची आठवण करून देतो. इब्राहीम (अ.) यांनी अंधश्रद्धा, अन्यायकारक रूढी व धार्मिक शोषण यांच्याविरोधात आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या या लढ्यात संपूर्ण कुटुंबाने साथ दिली.'' ते पुढे म्हणाले, ''प्रेषित इस्माईल (अ.) यांच्या वंशात शेवटचे प्रेषित मुहम्मद (स.) यांचा जन्म झाला. मूळतः इब्राहीम (अ.) व इस्माईल (अ.) यांनी मक्का येथे उभारलेली मक्का मशीद आजही एकेश्वरवाद, समता आणि विश्वबंधुत्वाचे प्रतीक आहे.'' प्रमुख पाहुणे इंजिनिअर वाजीद अली खान यांनी बकरीदचा ४००० वर्षांपूर्वीचा इतिहास विशद करत सांगितले की, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी इतर सर्व प्रेषितांचा वारसा योग्य रीतीने चालवून आदर्श समाज, कुटुंब आणि राष्ट्र घडवण्याची दिशा दाखवली. हज्ज यात्रेद्वारे आजही मुस्लिम बांधव एकत्र येऊन त्या समतेच्या विचारांना श्रद्धांजली अर्पण करतात. कार्यक्रमास सावित्री फातेमा सद्भावना मंचाचे अध्यक्ष ॲड. संभाजी बोरुडे, मराठा सेवा संघाचे विठ्ठल गुंजाळ, अशोक सब्बन, नवेद बिजापुरे, मुश्ताक, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, फिरोज शेख आदींसह विविध धर्मांचे मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुबीन खान यांनी केले. प्रश्नोत्तरांच्या सत्रात अनेक शंका-कुशंकांचे समाधान करण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी जमाअतचे स्थानिक अध्यक्ष सय्यद नईम यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले.




# डॉ. तनपुरे साखर कारखाना चेअरमनपदी अरुण तनपुरे बिनविरोध

**राहुरी । शफीक बागवान**

डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन पदी जनसेवा मंडळाचे नेते अरुण बाबुराव तनपुरे यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली आहे. काल गुरुवारी सकाळी तनपुरे साखर कारखान्याशी संलग्न असलेल्या विवेकानंद नर्सिंग होम येथे चेअरमन पदासाठीच्या निवडणूक प्रक्रियेसाठी प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किरण सावंत पाटील यांच्या उपस्थितीत अध्यक्षपदाची निवड प्रकिया पार पडली.

डॉ तनपुरे कारखान्याच्या चेअरमनपदी अरुण तनपुरे यांची बिनविरोध निवड होताच त्यांच्या कार्यकर्त्यांकडून जोरदार फटाक्यांची आतषबाजी करुन आनंदोत्सव साजरा केला. यावेळी डॉ तनपुरे कारखान्याच्या सर्व संचालक मंडळाने नवनियुक्त चेअरमन अरुण तनपुरे यांचा यथोचित सन्मान केला. या प्रसंगी प्रेरणा उद्योग समूहाचे अध्यक्ष सुरेश वाबळे, डॉ तनपुरे कारखान्याचे नवनिर्वाचित संचालक रावसाहेब (चाचा) तनपुरे, युवा नेते हर्ष तनपुरे, अशोक उर्हे, ज्ञानेश्वर कोळसे, अरुण ढुस , कृष्णा मुसमाडे,भारत वारुळे, मीना करपे, ज्ञानेश्वर खुळे, ज्ञानेश्वर पवार, प्रमोद तारडे, वैशाली तारडे, सुनील मोरे, किसन जवरे, भास्कर ढोकणे, जनार्दन गाडे, अरुण ठोकळे, सपना भुजाडी, जनाबाई सोनवणे, अशोक तमनर आदी उपस्थित होते.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

भाड्याने देणे
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# बालवैज्ञानिक परीक्षेत आत्मा मालिकचा श्रेयष नलावडे राज्यात प्रथम

## एकूण ३७ विद्यार्थी गुणवत्ता यादीत



**कोपरगाव । प्रतिनिधी**

जनसेवा सामाजिक व शैक्षणिक प्रतिष्ठान आयोजित राज्यस्तरीय डॉ. सी. व्ही. रमन बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलाच्या आत्मा मालिक सेमी इंग्लिश मिडीयम गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या परीक्षेत एकूण ३७ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले असून श्रेयष नलावडे याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच श्रेयष भवर याने राज्यात तृतीय, तर उन्नती सात्रस व मनस्वी सोनवणे यांनी पंचम क्रमांकावर झळकून आपली बुद्धिमत्ता सिद्ध केली आहे. या परीक्षेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक वृत्ती, विज्ञानाची अभिरुची आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे हा आहे. आत्मा मालिक संस्थेत विज्ञान विषयाचे विविध उपक्रम सातत्याने राबवले जातात आणि विज्ञान स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना तज्ज्ञ मार्गदर्शन दिले जाते. त्यामुळेच हे यश शक्य झाल्याचे प्राचार्य डॉ. निरंजन डांगे यांनी सांगितले. गुणवत्ता यादीत झळकलेल्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय विज्ञान कार्यशाळेसाठी निवड झाली आहे. जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत झळकलेल्या विद्यार्थ्यांमध्ये यश कणके, स्वरा झावरे, धनंजय दहिफळे, श्लोक कदम, सुजितकुमार गोल्हार, धनश्री रक्ताटे, तनिष्क शिंदे यांचा समावेश आहे. तालुकास्तरावरील गुणवत्ता यादीत स्थान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सिद्धार्थ भोसले, राज हासे, तनिष्का कोरडे, सुयश शिंदे, विश्वजीत त्र्यंबके, प्रांजल काळे, करण चारवंडे, शुभांगी गोलांडे, युविका पराडके, आराध्य गुरसळ, दर्शन गिरासे, श्रीतेज इंगोले, ज्ञानेश्वरी काळे, सिद्धार्थ पगारे, स्वरूप शेळके, भावेश पाचारणे, भाविका देवरे, आराध्य दिघे, मंगेश कदम, राजवीर कालेकर, नयन कणकाल, आदित्य पाटोळे, तेजस चोंडगीर, तन्मय गाडेकर, मल्हार कजबाजे, सार्थक पाटील यांचा समावेश आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. निरंजन डांगे, विभागप्रमुख सचिन डांगे, अनिल सोनवणे, मीना नरवडे, सागर आहिरे, रविंद्र देठे, रमेश कालेकर, बाळकृष्ण दौंड, पर्यवेक्षक गणेश रासने, नयना शेटे, सुनील पाटील, नितीन अनाप यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या विद्यार्थ्यांचे यश हे परमपूज्य आत्मा मालिक माऊलींच्या कृपाशीर्वादाचे फलित असून संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंत भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठल होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदीपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे आणि प्राचार्य डॉ. डांगे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# ‘रयत’मध्ये ‘एआय’ ही क्रांतीची पहाट- पोटे

## महादजी शिंदे विद्यालयात प्रवेशोत्सव साजरा

**श्रीगोंदा । प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विद्यालयात इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचे प्रवेशोत्सवदिनी मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. रंगीबेरंगी फुगे, रांगोळीचे सजलेले पटांगण, आणि हातात नवी कोरी पुस्तके घेतलेले हसतमुख बालगोपाळ अशा आनंदमय वातावरणात १६ जून रोजी ‘प्रवेशोत्सव दिन’ साजरा झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ होते. प्रास्ताविकात त्यांनी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करत शिक्षणाच्या मूल्यांवर प्रकाश टाकला. यावेळी बोलताना विद्यालयाच्या स्थानिक स्कूल समितीचे सदस्य मनोहर पोटे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगताना म्हटले, ‘‘शिक्षण हे महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षाचे फलित आहे. हे शिक्षण आत्मसात करून विद्यार्थ्यांनी स्वतःच्या जीवनात तसेच समाजात परिवर्तन घडवून आणले पाहिजे.’’

ते पुढे म्हणाले, ‘‘रयत शिक्षण संस्था आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स यांच्यातील संलग्नता म्हणजे नव्या युगाच्या क्रांतीची पहाट आहे. या क्रांतीसाठी आपण सज्ज राहणे गरजेचे आहे.’’ विद्यालयाचे गुणवत्ता विभाग प्रमुख सुधीर साबळे यांनी विद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. विविध स्पर्धा परीक्षा, उपक्रम आणि प्रकल्पांतून विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाची माहिती त्यांनी दिली.

या कार्यक्रमाला एलआयसीचे अधिकारी गदादे, शिक्षणप्रेमी पांडुरंग जगदाळे, पीटर रणसिंग, विविध गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पालक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास लबडे यांनी तर आभार प्रदर्शन विद्यालयाचे उपप्राचार्य शहाजी एकाड यांनी केले.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांत इतिहास घडवण्याचा निर्धार- ॲड.वर्पे



**कोपरगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि पक्षाचे प्रदेश प्रवक्ते ॲड. संदीप वर्पे यांनी स्पष्ट केले की, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पूर्ण ताकदीने उतरणार असून, कोपरगावसह जिल्ह्यात पुन्हा एकदा इतिहास घडवण्याचा निर्धार पक्षाने केला आहे. श्रीरामपूर येथे झालेल्या कार्यक्रमानंतर खासदार शरदचंद्र पवार मुंबईला जात असताना कोपरगाव मार्गे नगर-मनमाड महामार्गावर स्वस्तिक हॉटेलजवळ पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जंगी स्वागत केले. यावेळी त्यांच्या पत्नी प्रतिभा पवार, आणि ॲड. संदीप वर्पे उपस्थित होते.

स्वागतानंतर खासदार पवारांचा ताफा मुंबईकडे रवाना झाला. प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ॲड. वर्पे यांनी सांगितले की, पुण्यात नुकत्याच पार पडलेल्या पक्षाच्या २६ व्या वर्धापन दिनानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत पक्ष अधिक सक्रीय झाला आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांमध्ये स्थानिक नेतृत्वाला निर्णयाचे अधिकार देण्यात आले असून, पक्ष संघटन मजबूत करण्यात येत आहे. ‘‘लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी एकत्र होती आणि स्थानिक निवडणुकाही याच आघाडीच्या माध्यमातून लढवण्यात येतील,’’ असेही त्यांनी स्पष्ट केले. ‘‘कोपरगावसारख्या ठिकाणी स्वच्छ प्रतिमा असलेल्या आणि जनतेच्या मनात स्थान असलेल्या उमेदवारांनाच संधी दिली जाईल,’’ असे ते म्हणाले. ‘‘आज आमच्याकडे स्थानिक, राज्य किंवा केंद्राची सत्ता नसली तरीही जनतेचा भरवसा आमच्यावर आहे. हा विश्वास शरद पवार, उद्धव ठाकरे, राहुल गांधी, बाळासाहेब थोरात यांच्या मूल्याधिष्ठित राजकारणामुळे मिळतो आहे. आम्ही जनतेशी निष्ठा ठेवून काम करत आहोत,’’ असेही ॲड. वर्पे यांनी ठामपणे सांगितले. शरद पवार यांच्या कोपरगावमार्गे प्रवासादरम्यान कोकमठाण परिसरात तालुक्यातील राजकीय समीकरणांवर सविस्तर चर्चा झाली. ‘‘महाविकास आघाडीमधील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट हे एकत्र येऊन ताकदवान उमेदवार उभे करतील. मतविभाजन टाळणे आणि एकजूट हीच आमची ताकद असेल,’’ असेही त्यांनी सांगितले.

# एकाचवेळी सहा वाहनांचा अपघात


# एसटी बसमधील दोन प्रवासी गंभीर जखमी

## ट्रक चालक फरार

**पाथर्डी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कल्याणनिर्मळ राष्ट्रीय महामार्गावरील करंजी घाटात गुरुवारी सकाळी साडेआठच्या सुमारास एक धक्कादायक अपघात घडला. नगरकडून पाथर्डीकडे येणाऱ्या ट्रकने समोरून येणाऱ्या एसटी बस, इनोव्हा कार, टेम्पो, जीप व मोटरसायकल अशा एकूण सहा वाहनांना धडक दिली. या अपघातात विठ्ठलवाडी डेपोची एसटी बस आणि इतर वाहने जबर धडकले. बसमधील दोन प्रवासी गंभीर जखमी झाले असून, इतर वाहनांमधील काही प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. गंभीर जखमींना तात्काळ तिसगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी हलविण्यात आले आहे. अपघातानंतर ट्रकचा चालक ट्रक घटनास्थळीच सोडून फरार झाला आहे. करंजी घाटातील माणिक शहा पिरबाबा दर्गा जवळील अत्यंत धोकादायक वळणावर हा अपघात घडला. अपघातानंतर दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या आणि संपूर्ण घाट रस्त्यावर वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. थोड्याच वेळात राज्य महामार्ग पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्या प्रयत्नांनी वाहतूक सुरळीत करण्यात आली. सुरुवातीला अपघात नेमका किती वाहनांचा व कशामुळे झाला, याबाबत संभ्रमाचे वातावरण होते. परंतु तपासणीतून समजले की एका ट्रकने पाच वाहनांना धडक दिली होती. या अपघातात सर्व वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, संबंधित वळणावर वारंवार अपघात घडत असल्याने राष्ट्रीय महामार्ग विभागाने तांत्रिकदृष्ट्या रस्ता दुरुस्ती करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

> **‘‘ट्रक चालकाचा बेदरकारपणा आणि अतिवेगच या अपघाताचे प्रमुख कारण आहे. नशिब बलवत्तर म्हणून जीवितहानी टळली. पोलीस प्रशासनाने अशा चालकांविरोधात कडक कारवाई करावी आणि वाहन तपासणीसाठी नियमित मोहीम हवी. करंजी घाटातील धोकादायक वळण त्वरित दुरुस्त करणे गरजेचे आहे.’’**
>
> **वेदांत मानूरकर,** प्रवासी



# राज्य साखर कामगार उपाध्यक्षपदी डी.एम. निमसे



**नेवासा । विजय खंडागळे**


महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाच्या उपाध्यक्षपदी डी. एम. निमसे यांची एकमताने सर्वानुमते निवड करण्यात आली. ही निवड सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना, सोलापूर येथे पार पडलेल्या मंडळाच्या कार्यकारी मंडळ व वार्षिक जनरल कौन्सिल बैठकीत करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी तात्यासाहेब काळे होते. डी. एम. निमसे हे नेवासा तालुक्यातील मुळा सहकारी साखर कारखान्याच्या युनियनचे सरचिटणीस म्हणून कार्यरत असून, कामगारांच्या विविध समस्या सोडवताना त्यांनी संयम, समतोल आणि न्यायाचे धोरण पाळत काम केले आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण योगदानाची ही नियुक्ती एक पावती ठरली असून, संघटनेसाठी ती निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. बैठकीच्या प्रारंभी दिवंगत माजी सरचिटणीस शंकरराव भोसले व इतर साखर कामगारांना उपाध्यक्ष युवराज रणवरे यांनी श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर विविध पदांवर पुढीलप्रमाणे नियुक्त्या करण्यात आल्या: कार्याध्यक्ष : राजेंद्र चव्हाण (राजारामबापू सहकारी साखर कारखाना), सरचिटणीस : राऊ शंकर पाटील (कोल्हापूर) शंकरराव भोसले यांच्या निधनामुळे रिक्त पदावर, उपाध्यक्ष : डी. एम. निमसे (मुळा कारखाना युनियन) यावेळी तात्यासाहेब काळे यांनी साखर कामगारांच्या समस्या आणि त्रिपक्षीय समितीच्या चार महत्त्वाच्या बैठकीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कोषाध्यक्ष प्रदीप बनगे यांनी आर्थिक अहवाल सादर केला. या कार्यक्रमास सिद्धेश्वर साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक सलगर, कार्याध्यक्ष अविनाश आपटे, युवराज रणवरे, प्रदीप शिंदे, राजेंद्र तावरे, संजय पाटील, सयाजी कदम यांच्यासह विविध जिल्ह्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रतिनिधी ज्ञानदेव पाटील (प्रवरा), सचिन कोकाटे (राजाराम कारखाना), विजय पाटील (पांडुरंग कारखाना), अशोक अरगडे (ज्ञानेश्वर कारखाना) यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रशेखर कलगे यांनी तर आभारप्रदर्शन विजय पाटील यांनी केले. डी. एम. निमसे यांच्या निवडीनंतर ज्येष्ठ नेते यशवंतराव गडाख, माजी आमदार शंकरराव गडाख, तसेच मुळा कारखान्याचे पदाधिकारी व कर्मचाऱ्यांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. ही बैठक साखर कामगारांच्या हक्कांसाठी व भविष्यकालीन धोरणांसाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे.

# न्यू आर्ट्‌समध्ये एम.ए. राज्यशास्त्र आणि बीएस्सी मायक्रोबायलॉजी कोर्सला मान्यता

**शेवगाव । नरहरी शहाणे**

येथील न्यू आर्ट्‌स महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून एम.ए. राज्यशास्त्र आणि बीएस्सी मायक्रोबायलॉजी या दोन नवीन अभ्यासक्रमांना मान्यता मिळाली आहे.. बीएस्सी मायक्रोबायलॉजी या अभ्यासक्रमासाठी १२वी विज्ञान शाखा उत्तीर्ण विद्यार्थी पात्र असतील. तर बी.ए. राज्यशास्त्र उत्तीर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आता शेवगावमध्येच एम.ए. राज्यशास्त्रसारखा पदव्युत्तर अभ्यासक्रम करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. या महत्त्वपूर्ण यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांनी आनंद व्यक्त करत सांगितले, ‘‘ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होणार असून, विद्यार्थ्यांनी याचा पुरेपूर लाभ घ्यावा.’’ या नव्या अभ्यासक्रम मान्यतेबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वास आठरे, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, संस्थेचे जेष्ठ विश्वस्त जी. डी. खानदेशे आणि सदस्या निर्मला काटे यांनी प्राचार्य डॉ. कुंदे, उपप्राचार्य डॉ. युवराज सुडके, तसेच डॉ. गोकुळ मुंढे, डॉ. अशोक चोथे, डॉ. छाया भालशंकर आणि डॉ. उषा शेरखाने यांचे विशेष अभिनंदन केले.

# पक्षीतज्ज्ञ डॉ.सालीम अली



आज २० जून, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ञ डॉ सालीम अली यांचा आज स्मृतिदिन. २० जून १९८७ रोजी डॉ सालीम अली यांचे निधन झाले होते. पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबईत एका गरीब मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सालीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. डॉ सालीम अली हे एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे तर दोन वर्षाचे असताना आईचे निधन झाले. अगदी बालवयातच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अलींचा सांभाळ त्यांच्या मामांनी केला. सालीम अली यांना लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड होती. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी गळ्यावर पिवळा डाग असलेली चिमणी विकत घेतली होती. हा पक्षी कोणता आहे ? त्याचे नाव काय आहे ? हे त्यांना माहीत नव्हते म्हणून ते माहीत करून घेण्यासाठी ते त्या चिमणीला घेऊन मामांकडे गेले मामांनी सरळ त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या संचालकाकडे घेऊन गेले. तिथे संचालकांनी सलीम अलींना त्या पक्षाची सविस्तर माहिती सांगितली तसेच संस्थेतील भुसा भरलेल्या पक्षांचा संग्रह दाखवला. तो क्षण डॉ सालीम अलींच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या क्षणी त्यांच्यावर पक्षांची जी भुरळ पडली ती कायमचीच. त्यानंतर त्यांना पक्षी निरीक्षणाचा छंदच जडला. १९१३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ सालीम अली यांनी सेंट झेव्हीयर महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड असल्याने सलीम अली यांनी उच्च शिक्षणासाठी प्राणी विज्ञान हा विषय निवडला. या विषयात त्यांना बी ए ऑनर्स ही पदवी मिळवली मात्र ही पदवी विद्यापीठाच्या समकक्ष समजली जात नव्हती त्यामुळे त्यांना भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्व्हे क्षण संस्थेत नोकरी मिळू शकली नाही मात्र बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीत त्यांना व्याख्यता म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले तेथे जाऊन त्यांनी पक्षी शास्त्रावर प्रशिक्षण घेतले तिथे त्यांना जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ एर्व्हिन ष्ट्रेझमन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर काही काळ त्यांनी इंग्लंडमध्येही काम केले. १९३१ साली ते भारतात परत आले. परत आल्यावर त्यांनी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपकार्यवाहक पद स्वीकारले. नंतर ते या संस्थेचे अध्यक्षही बनले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी हैदराबाद पक्षी निरीक्षण, त्रावणकोर - कोचीन पक्षी सर्व्हेक्षण, अफगाणिस्तान पक्षी सर्व्हेक्षण, कैलास पक्षी निरीक्षण यात्रा अशा मोहिमा राबवल्या. डॉ सालीम अली यांनी सुगरण पक्षाच्या वर्तनावर बारकाईने अभ्यास केला व त्यावर बिएनएचएस जर्नलमध्ये एक शोधनिबंध लिहिला. या शोध निबंधाने त्यांना पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली. डॉ सालीम अली यांनी भारतभर फिरून विविध पक्षांची तपशीलवार माहिती गोळा केली. ती माहिती त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी पुस्तक रुपात लिहिली. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ इंडिया अँड पाकिस्तान व पिक्टोरियल गाईड या दहा खंडीय पुस्तकाने त्यांचे जगभर नाव झाले. डॉ डीलन रीलपे यांच्या साथीत त्यांनी अपार मेहनत घेऊन भारतीय पक्षांच्या बाराशे जाती, २१०० उपजातींच्या नोंदी, सवयी, शास्त्रशुद्ध सर्वांगीण माहिती चित्रांसाहित एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. डॉसालीम अली यांच्या ह्याच कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा निर्माण झाली. भारतातील पक्षी निरीक्षक डॉ सालीम अली यांना आद्य गुरू मानतात. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला तसेच त्यांचा जन्मदिन पक्षीदिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. डॉ सालीम अली यांचे २० जून १९८७ रोजी निधन झाले. डॉ सालीम अली यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# विखेंकडून हिंदू समाजाचा विश्वासघात- प्रकाश चित्ते

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

सरलापीठाचे महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते श्री शिवाजी महाराज चौकात नामदार विखे यांनी छ. शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भूमिपूजन केले. वर्षभरानंतर त्यांच्या राजकीय सोयीसाठी छत्रपतींच्या पुतळ्याची अचानक जागा बदलून नेहरू मार्केट भाजी मंडई मध्ये पुन्हा भूमिपूजन केले.



हा केवळ मुस्लिमांच्या मतांकारिता नामदार विखेंनी हिंदू समाजाचा केलेला विश्वासघात असून, श्रीरामपूर तालुक्यातील जनता हा विश्वासघात विसरणार नाही, असा अशी भावना हिंदू रक्षा कृती समितीचे निमंत्रक प्रकाश चित्ते यांनी व्यक्त केली. छत्रपतींच्या पुतळ्याची जागा बदलल्याच्या निषेधार्थ व छत्रपतींचा पुतळा श्री शिवाजी महाराज चौकातच व्हावा, या मागणीसाठी हिंदू रक्षा कृती समितीच्या वतीने श्रीरामपुरात मशाल मोर्चा व जाहीर सभेचे आयोजन केले होते. या जाहीर सभेचे अध्यक्षस्थानी सुदाम महाराज चौधरी हे होते. याप्रसंगी आचार्य महेश व्यास, हिंदू जनजागृती समितीच्या प्रतीक्षा कोरेगावकर, हभप सेवालाल महाराज, ऋषिकेश महाराज, भाजपचे माजी शहराध्यक्ष संजय पांडे, सुनील खपके, अशोक साळुंखे, सुरेश आसने आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये छत्रपतींचा पुतळा बसवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या बांधकाम रेषेच्या नियमाची अडचण आहे, असे सांगतात मग चाळीसगाव आणि तासगाव या तालुक्याच्या गावांमध्ये भरचौकामध्ये नॅशनल हायवेवर कायदेशीररित्या परवानगी घेऊन पुतळ्यांची प्रतिष्ठापना कशी झाली. येथे गावांमध्ये नॅशनल हायवे डी-नोटीफाय करून सार्वजनिक बांधकाम खात्याच्या बांधकामरेषेच्या नियमावर मार्ग काढण्यात आला व पुतळ्यांच्या प्रतिष्ठापना मोठ्या दिमाखात झाल्या. श्रीरामपुरच्या शिवाजी महाराज चौकातही त्याच पद्धतीने मार्ग काढून छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवला जाऊ शकतो. मात्र, शिवाजी चौकात बसवायचा नाही असाच निर्णय असेल तर हिंदू समाजाला न्याय मिळवण्यासाठी आंदोलनाच्या मार्गाने लढावे लागेल, असे चित्ते यांनी यावेळी स्पष्ट केली. यावेळी आचार्य महेशजी व्यास यांचे भाषण झाले. मोर्चास सर्व थरातून मोठा पाठींबा मिळाला.

# भाकपच्या अधिवेशनात संघर्षाचा निर्धार

## शेतकरी, शेतमजूर, कामगारांच्या न्यायहक्कांसाठी लढा उभारण्याचे ठराव

**अहमदनगर । प्रतिनिधी**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे त्रैवार्षिक जिल्हा अधिवेशन अहमदनगर शहरात उत्साहात पार पडले. या अधिवेशनात शेतकरी, शेतमजूर, श्रमिक-कामगार, असंघटित क्षेत्रातील मजूर, अल्पसंख्यांक यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात संघर्ष उभारण्याचा स्पष्ट ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.फ या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान राज्य सचिव अ‍ॅड. सुभाष लांडे यांनी भूषवले. राज्य सहसचिव डॉ. राम बाहेती यांची प्रमुख उपस्थिती होती.

महिला फेडरेशनच्या कॉ. स्मिता पानसरे, कॉ. बाबा आरगडे, कॉ. बबनराव सालके, जिल्हा सचिव अ‍ॅड. बन्सी सातपुते, सहसचिव अ‍ॅड. सुधीर टोकेकर आदींसह प्रत्येक तालुक्यातून प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

ठळक मागण्या व ठराव: शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा व सरसकट कर्जमाफी लागू करावी. शेतीमालाला हमीभावाचा कायदा व्हावा; स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी तात्काळ लागू कराव्यात. अतिक्रमण धारकांना विनाअट



पट्टे द्यावेत; गायरान व वनजमिनी नियमित कराव्यात. कामगारांना किमान २६-३० हजार रुपये वेतन मिळावे; असंघटित क्षेत्रात किमान वेतन २१ हजार असावे. १९५२ व १९९५च्या निवृत्ती वेतन कायद्यानुसार पेन्शन रक्कम पाच हजार रुपये करण्यात यावी. भांडवलदार धार्जिण्या नवीन कामगार संहितांचा विरोध; जुन्या कामगार कायद्यांची अंमलबजावणी करावी. साठ वर्षावरील शेतकरी, शेतमजूर, कारागिर यांना ५,००० रुपये मासिक पेन्शन द्यावी. 'जनसुरक्षा विधेयक' मागे घ्यावे; बेरोजगारांना नोकरी किंवा भत्ता द्यावा. लाडकी बहिण योजनेसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करावी.

महिलांच्या सुरक्षेसाठी कायद्यांची कठोर अंमलबजावणी करावी. दलित, आदिवासी, अल्पसंख्यांकांवरील अत्याचार थांबवावेत. पिक विमा योजना शेतकरी हिताची व्हावी. सरकारी व निमसरकारी विभागातील रिक्त पदे तात्काळ भरावीत.

### कार्यकारिणी निवड पूर्ण

नवीन जिल्हा कार्यकारिणी निवड: अधिवेशनात पुढील तीन वर्षांसाठी नवीन भाकप जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. खालील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली: जिल्हा सचिव: अ‍ॅड. बन्सी सातपुते, जिल्हा सहसचिव: अ‍ॅड. सुधीर टोकेकर, कॉ. संतोष खोडदे, सदस्य: अ‍ॅड. सुभाष लांडे, स्मिता पानसरे, भगवान गायकवाड, बाबा आरगडे, लक्ष्मण नवले, निवृत्ती दातीर, प्रताप सहाणे, सुरेश पानसरे, कानिफनाथ तांबे, सुनील दुधाडे, भारत आरगडे, भारती न्यालपेल्ली, संदीप इथापे, बबन पाटील सालके, आप्पासाहेब वाबळे यांची निवड करण्यात आली. भाकपच्या नाशिक येथे होणाऱ्या राज्यस्तरीय त्रैवार्षिक अधिवेशनासाठी जिल्ह्यातून प्रतिनिधींची निवड देखील यावेळी करण्यात आली.

# संतांच्या महाराष्ट्रात दलित-आदिवासींवरील अत्याचारात वाढ- ढवळे

## कर्जुले पठार आणि कोकणगाव घटनांचा निषेध; संगमनेरमध्ये निषेध मोर्चा आणि रास्ता रोको आंदोलन

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

महाराष्ट्र ही संत-महापुरुषांची भूमी असूनही येथे दलित व आदिवासी समाजावर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया एकलव्य संघटनेचे अध्यक्ष शिवाजी ढवळे यांनी व्यक्त केली. त्यांनी संगमनेर तालुक्यातील कर्जुले पठार येथील आदिवासी महिलेच्या हत्येप्रकरणी तीव्र शब्दांत शासन यंत्रणेवर निशाणा साधला. संगमनेर शहरातील बसस्थानक परिसरात दलित व आदिवासी संघटनांच्या वतीने निषेध मोर्चा आणि रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर जमलेल्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत बसस्थानकाजवळ निषेध नोंदवला. या आंदोलनात कोकणगाव येथील युवकाच्या मृत्यूप्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करावा, खाजगी रुग्णालयांनी उपचार नाकारल्याबद्दल



त्यांच्यावर कारवाई करावी, कर्जुले पठार प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, तसेच पीडित कुटुंबाला धमकी देणाऱ्यांवर तात्काळ बंदोबस्त करण्यात यावा अशा मागण्या करण्यात आल्या. या घटनांबाबत स्थानिक आजी-माजी आमदारांनी बघ्याची भूमिका घेतल्यामुळे आंदोलकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. त्यांच्यावर निष्क्रीयतेचे आरोप करण्यात आले. ''दलित-आदिवासींच्या व्यथा समजून घेण्याऐवजी ते दुर्लक्ष करतात,'' असे वक्तव्य आंदोलनकर्त्यांनी केले. या आंदोलनासाठी पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे आणि पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. रास्ता रोकोमुळे नाशिक-पुणे महामार्गावर दीड तास वाहतूक ठप्प झाली होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. या आंदोलनात एकलव्य संघटनेचे अध्यक्ष शिवाजी ढवळे, रिपाई जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, सामाजिक कार्यकर्ते संतोष रोहम, विद्रोही संघटनेचे जिल्हाध्यक्ष दिलीप बर्डे, मनसे तालुकाध्यक्ष योगेश सूर्यवंशी, तसेच अनेक संघटनांचे प्रतिनिधी, युवक, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

> **''प्रधानमंत्री म्हणतात शौचालय पहले, मंदिर बाद; पण येथे शौचालय नसल्याने एका महिलेचा जीव जातो, हे दुर्दैव!'' कर्जुले पठार येथे एका आदिवासी महिलेला शेतात शौचासाठी गेल्यामुळे जीव गमवावा लागला. या घटनेबाबत त्यांनी दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली. पोलीस यंत्रणा सत्ताधाऱ्यांच्या इशाऱ्यावर काम करत असून, तक्रार नोंदविण्याऐवजी न्यायाधीशासारखी भूमिका घेत आहे.**
>
> **शिवाजी ढवळे**

# शनैश्वर देवस्थान आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी चौकशीला वेग

### मुंबईहून हालचाली सुरु

**नेवासा । विजय खंडागळे**

देशपातळीवर श्रद्धास्थान मानल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र शनिशिंगणापूर देवस्थानच्या कारभाराबाबत गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर चौकशीची प्रक्रिया मुंबईहून वेगाने पुढे सरकली आहे. बनावट ॲपद्वारे तेल विक्रीतील घोटाळा, खोट्या डोनेशन पावत्या, आर्थिक गैरव्यवहार, व अफरातफरी यासंबंधीचे आरोप गेल्या काही महिन्यांपासून सतत होत होते. आता या प्रकरणात धर्मदाय आयुक्त कार्यालय व राज्य विधी व न्याय मंत्रालयाने लक्ष घालून अधिकृत चौकशी सुरू केल्याची माहिती समोर आली आहे. राज्याचे जलसंधारण मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे यांनी याप्रकरणात गंभीर दखल घेतली होती. त्यांच्या सूचनेनंतर मुंबई येथील धर्मदाय आयुक्त कार्यालय व विधी व न्याय मंत्रालयाच्या माध्यमातून चौकशी प्रक्रियेस गती मिळाली आहे. सूत्रांनी दिलेल्या खात्रीलायक माहितीनुसार, कायदेतज्ज्ञ, घटनातज्ज्ञ व विशेष तपास पथक लवकरच शनिशिंगणापूरमध्ये दाखल होणार असून, देवस्थानमधील कथित गैरव्यवहारांच्या मुळापर्यंत पोहोचण्यासाठी तपास सुरू केला जाणार आहे. या पथकाच्या माध्यमातून सायबर गुन्हे शाखेची मदत घेऊन बनावट ॲपद्वारे आर्थिक व्यवहार करणाऱ्यांच्या खात्यांची चौकशी केली जाणार आहे. या घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर यापूर्वी ग्रामसभेच्या माध्यमातून देवस्थानच्या कारभारावर ठराव पारित करण्यात आलेला आहे. सध्या गावात शांततेचे वातावरण असले तरी शनीभक्त, हिंदुत्ववादी संघटना व राजकीय पक्षांकडून या प्रकरणाचा पुढील तपास आणि कारवाईवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.



स्थानिक सूत्रांच्या माहितीनुसार, चारशे ते पाचशे कोटी रुपयांपर्यंतच्या बनावट आर्थिक व्यवहारांचे पुरावे तपास यंत्रणांच्या हाती लागण्याची शक्यता असून, काही खाजगी कर्मचाऱ्यांच्या खात्यांमध्ये थेट रक्कम जमा झाल्याचेही निष्पन्न झाले आहे. यामुळे कारभारातील अंधार आणखी उघड होण्याची चिन्हे आहेत. देवस्थानसारख्या श्रद्धास्थळाचा आर्थिक कारभार पारदर्शक व भक्तांच्या विश्वासास पात्र राहावा, यासाठी ''सत्य ते सत्य शनि देवापुढे यायला हवे'' अशी जनभावना निर्माण झाली आहे. गावकरी, शनी भक्त आणि समाजातील विविध घटक या चौकशीची उत्सुकतेने वाट पाहत आहेत. ''चोर सोडून संन्याशाला फाशी'' अशी स्थिती निर्माण होऊ नये, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.